# ‘चित्‌शक्ती विलास’मधील एका उद्धरणाचा परिचय

वर्ष १९६९मधील मे महिना होता. गुरुदेव सिद्धपीठामध्ये उष्म्याने उच्चांक गाठला होता, इतका अधिक की हवेमध्येदेखील त्याची हलकीशी चमक जाणवू लागली होती. स्वामी मुक्तानंद आपली आत्मकथा लिहिण्याची योजना आखत होते.

बाबांनी [स्वामी मुक्तानंदांना लोक प्रेमाने या नावाने संबोधत असत] एका सिद्धयोग्याला जेव्हा त्यांच्या ग्रंथ लिहिण्याच्या योजनेविषयी सांगितले, तेव्हा त्यांनी बाबांना असे सुचवले की, इतक्या महान कार्याचा आरंभ गणेशपुरीच्या या अत्यंत तीव्र उष्म्याच्या वातावरणात करण्याऐवजी, त्यांनी भारताच्या पश्चिमी घाटामध्ये स्थित असलेल्या महाबळेश्वरला जावे. पर्वतीय प्रदेशामध्ये वसले असल्यामुळे महाबळेश्वरचे वातावरण थंड असते आणि त्यामुळे ते स्थान एकाग्रतेने काम करण्यास उपयुक्त राहील. तिथल्या प्रवासाची व राहण्याची व्यवस्था करण्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ देण्याची कुवत त्या सिद्धयोग्यापाशी होती आणि तसे करण्याची इच्छा त्यांनी प्रकट केली.

बाबांनी त्यांच्या या आमंत्रणाचा स्वीकार केला आणि बाबा, हे सिद्धयोगी तसेच इतर आणखी काही सिद्धयोगींनी कारने महाबळेश्वरला प्रस्थान केले. ८ मे रोजी या सर्वांचे महाबळेश्वला आगमन झाले; ते पोहोचले तेव्हा हवा थंड होती आणि सकाळचे धुके दरीमध्ये खोलवर तरंगत होते. त्यानंतर काही दिवसांनी, म्हणजे सोमवारी, १२ मे, १९६९ रोजी, बाबांनी आपल्या लेखनकार्याचा श्रीगणेशा केला.

पुढील वीस दिवस, बाबांचे लिखाण सुरू राहिले—प्रामुख्याने ते स्वतःच लिहीत असत आणि कधीकधी, त्यांच्यासोबत आलेल्या दोन सिद्धयोगींना काही मजकूर मोठ्याने सांगून त्यांच्याकडून लिहून घेत असत, त्यांच्यापैकी एक होते दादा यंदे. छापून झाल्यावर हा ग्रंथ अंदाजे ३०० पानी होणार होता. हस्तलिखित तयार झाल्यावर बाबांनी, त्यांच्यासमवेत महाबळेश्वरला जे लोक गेले होते त्या सर्वांना एकत्र बोलावले. एका कार्यक्रमाचे आयोजन केले गेले, ज्यामध्ये बाबांनी त्यांच्या ग्रंथाचे नाव सर्वांना सांगितले : ‘चित्‌शक्ती विलास’.

छापून झाल्यानंतर ‘चित्‌शक्ती विलास’ हा तत्काळ एक अभिजात ग्रंथ, सिद्धयोग मार्गाची आधारशिला ठरला—एक असा अद्वितीय आणि असामान्य ग्रंथ, ज्यामध्ये बाबांची स्वतःची साधना आणि त्यांची प्राप्ती याविषयीच्या सविस्तर झलकी दिल्या गेल्या आहेत.

बाबांच्या या महान लेखनकार्याच्या ५२व्या वर्धापनदिवसाचा स्मरणोत्सव साजरा करण्यासाठी, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर बाबांच्या ग्रंथातील एक उद्धरण प्रकाशित केले जात आहे. हे उद्धरण ‘चिद्विलास’ हे शीर्षक असलेल्या प्रकरणातून घेण्यात आले आहे.

## प्रकरण चौतीस

### चिद्विलास

पृष्ठ २०१-२०३

आताही मी ध्यान करतो, तेव्हा ध्यानात तन्मय झाल्यावर नीलरश्मी, नीलपुंज आणि त्या चिन्मयाच्या मध्यभागी नीलबिंदू पाहतो. तो मृदू, चिन्मय तेजोपुंज अतिसूक्ष्म रूपाने हालत असलेला, चमकत असलेला साऱ्या अवस्थांमध्ये मला दिसतो! भोजन करताना, पाणी पिताना, स्नान करताना, बस्स तो माझ्या डोळ्यांसमोर उभा असतो! झोपलो तरी निद्रास्थानातही तो असतोच. आता माझी दृष्टी द्वैत-अद्वैतरहित झाली आहे, कारण द्वैत-अद्वैत दोन्हीतही तोच व्याप्त आहे. आता देश, काल, वस्तुभेदाची मर्यादा राहिलेली नाही. नीलाचे सर्वत्र सूक्ष्म असे जे प्रसरण आहे, ते माझ्या आत्म्यातही विश्वाकाराने व्याप्त आहे. न दिसणारेही मी पाहू शकतो. ज्याप्रमाणे न दिसणारे गुप्तधन मंत्रांजन लावल्याने दिसते, त्याचप्रमाणे श्रीगुरुदेवांच्या कृपेने आणि पारमेश्वरी कुंडलिनीच्या प्रसादाने, ते दिव्य साक्षात्कार करविणारे नील अंजन, माझ्या डोळ्यांना लागल्यामुळे न दिसणारे म्हणजे अतिसूक्ष्मही मला दिसते. चहूबाजूंना माझ्या आत्म्याचीच विश्वाकार व्याप्ती आहे, असे मी आता पूर्णपणे जाणले आहे. प्रपंच अस्तित्वातच नाही, कधी झालाच नाही; ज्याला आपण प्रपंच असे म्हणतो तो तर चितिशक्तीचा केवळ चिन्मय विलास आहे, असा माझा पूर्ण निश्चय झाला आहे. ‘सोऽहम्’मध्ये ज्याला ‘सः’ आणि ‘अहम्’ म्हणतात, त्याला मी सहज जाणतो. वेदान्त जिला ‘तत्त्वमसि’ विद्या म्हणतो आणि ज्या विद्येच्या फलश्रुतिला ब्रह्मानंद म्हटले गेले आहे, तेच माझ्या अंतरात सूक्ष्मरूपाने स्फुरणारे माझे स्वरूप आहे.

याच्या पुष्टीकरणार्थ ‘प्रत्यभिज्ञाहृदयम्’ या ग्रंथातील प्रमाण देत आहे. त्यात म्हटले आहे की, परमात्मा शिवाची दृष्टी अशी आहे :

*... श्रीमत्परमशिवस्य पुनः विश्वोत्तीर्ण-*
*विश्वात्मक-परमानन्दमय-*

*प्रकाशैकघनस्य एवंविधमेव*
*शिवादि-धरण्यन्तं अखिलं*
*अभेदेनैव स्फुरति, न तु वस्तुतः*
*अन्यत् किंचित् ग्राह्यं ग्राहकं वा,*
*अपि तु श्रीपरमशिवभट्टारक एव इत्थं*
*नानावैचित्र्यसहस्रैः स्फुरति।* [१]

याचा अर्थ असा, की ज्यांना आपण परमेश्वर पराशक्ती म्हणतो त्या भगवान परशिवांसाठी विश्व नावाची कोणती वस्तूच नाही. ते केवळ सत्य, नित्य, निर्गुण, निराकार, व्यापक आणि पूर्ण आहेत. त्यांना शिवापासून पृथ्वीपर्यंत म्हणजे स्थावरजंगमात्मक दिसणारे, प्रकट-अप्रकट असे सारे जगत अभेदरूपाने, परमानंदमय, प्रकाशरूप, स्वतःहून अभिन्न असे प्रतीत होते. वास्तविक त्यांच्याशिवाय अन्य काहीही नाही, द्रष्टा-दृश्य भावही नाही, ग्राह्य-ग्राहक भावही नाही, जीव-शिव भावही नाही, जड-चेतन भावही नाही. परंतु श्रीमत् परम शिव परमेश्वर एकटाच या जगताच्या चित्रविचित्र अशा अनेक रूपांमध्ये स्फुरतो आहे. हे विश्व भगवंताचे शरीर आहे आणि या विश्वरूपात परम शिवच आपल्या आत्मस्थितीत उभा आहे असे आता मी पाहतो.

ज्ञानदेवांचा तो अभंग, ज्याने हा ग्रंथ [चित्शक्ती विलास] लिहिण्यास सुरुवात केली होती, त्याचे अंतिम दोन चरण असे आहेत :

*तयाचा मकरंद स्वरूप ते शुद्ध। ब्रह्मादिका बोध हाची झाला॥*
*ज्ञानदेव म्हणे निवृत्ति प्रसादे। निजरूप गोविंदे जनी पाहता॥*

‘ज्या नीलेश्वराचे मी वर्णन केले आहे, त्याच्या आतमध्ये त्याचे जे मूळ आहे, त्याचा जो रस आहे, म्हणजे जो शुद्ध परमानंदमय बोध आहे, तेच परमात्म्याचे शुद्ध स्वरूप आहे. ब्रह्मापासून ते साऱ्या ऋषिमुनींपर्यंत सर्वांना हाच बोध झाला आहे.’ साक्षात्काराचा अनुभव सांगताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, “श्रीसद्गुरू निवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाने प्राप्त झालेले माझे अंतर्गत निजरूप, जे नील आहे, तेच परमात्मा श्रीगोविंद आहे. त्याला सर्व जनांमध्ये मी पाहतो.”

सर्वव्यापक परमेश्वर, परमात्म्याशिवाय अन्य काहीही नाही, हे वेदान्ताचे कथन सत्य आहे. वस्तुतः परमात्म्याचे हे ज्ञानच जीवनाचे सार आहे, ज्या ज्ञानाच्या प्राप्तीने आपला संसार अमृतमय बनून जातो. परमात्म्याच्या अशा ज्ञानाची मानवाला अत्यंत आवश्यकता आहे. हे ज्ञान शक्तिपातानेच संभवते. सिद्धकृपेनेच साऱ्या महात्म्यांनी आपल्या अंतरात परमेश्वराला प्राप्त केले आहे. वर सांगितलेले ज्ञानेश्वर

महाराजांचे जे अनुभव आहेत, तेच सर्वांचे पूर्ण अनुभव आहेत. जनक, सनक, नारद वगैरे मुनींनी आपल्या ज्या निजस्वरूपाचे अनुसंधान केले, तेच परंपरागत परमानंदमय ज्ञानाचे तत्त्व आहे; तोच परमानंदमय गोविंद आहे जो सर्व जनांमध्ये दिसतो. ज्ञानी मनुष्यापासून अज्ञानी मनुष्यापर्यंत सर्व माणसांत तो दिसेल, मग ते मूढ असोत किंवा वेडे, कारण वेडेपणा आणि मूढता या मनाच्या वृत्ती आहेत, आत्मा परम शुद्ध आहे. सहस्रदलातील ब्रह्मरंध्राच्या मध्यात ज्याचा निवास आहे, तो षोडशकलातीत पुरुष निरंतर तिथे वास करीत असतो. या पुरुषाला 'सतरावी' असेही नामाभिधान आहे. षोडशकलेच्या वर जो 'सतरावा' आहे तो आत्मा आहे. ज्याची दृष्टी पूर्ण शुद्ध झाली आहे, त्याला आत्मरूप नीलवर्ण सहस्रदलात भासमान होतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, हे परम गुह्य तत्त्व मी सद्‌गुरुकृपेने सांगतो आहे.

यथार्थ सत्य हे आहे, की हे जगत 'चिद्विलास' आहे, चितिशक्तीचे उन्मीलन आहे; परंतु चितीचे ज्ञान न झाल्यामुळे जगत्-रूपाने भासते. जेव्हा चितिज्ञान होईल तेव्हा जगत दिसणार नाही, सर्वत्र चितीच दिसेल.

वसुगुप्ताचार्यांचे हे कथन सत्य आहे :

> *इति वा यस्य संवित्तिः क्रीडात्वेनाखिलं जगत*
> *स पश्यन्सततं युक्तो जीवन्मुक्तो न संशयः*
>
> जो सतत या संपूर्ण विश्वाला ब्रह्मांडीय चितीची क्रीडा म्हणून पाहतो, तो सत्यतः आत्मसाक्षात्कारी आहे यात काहीच शंका नाही; तो या शरीरात राहूनही मुक्त झाला आहे.

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] क्षेमराज, प्रत्यभिज्ञाहृदयम्, सूत्र ३ वर भाष्य.

[२] स्पंदशास्त्र.